N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** ठाणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** शहापूर **Year (वर्ष):** 2026

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0012

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**10/01/2026 06:55

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):** पहर 4

**Date From (दिनांक पासून):** 09/01/2026

**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/01/2026

**Time From (वेळेपासून):** 11:52 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:39 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/01/2026 **Time (वेळ):** 05:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/01/2026 05:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** खर्डी वाडा रस्त्यावर बागेचापाड, चंदन पार्क समोरील रोडवर ,शहापुर जि ठाणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): भारत एकनाथ जाधव

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन क्र)

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अन्टी करप्षन ब्युरो, ठाणे,ठाणे,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अन्टी करप्षन ब्युरो, ठाणे,ठाणे,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8108558812

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भगवान जयराम भोईर | | | 1. परिमंडळ वनअधिकारी काष्टी, खर्डी,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र, भारत |
| 2 | नितेष हुकुमचंद राठोड | | | 1. वनरक्षक खर्डी,शहापुर,ठाणे ग्रामीण ,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10.**Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी भारत एकनाथ जाधव, वय 47 वर्षे, पोलीस उप अधीक्षक, अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे. मोबाईल नं. 8108558812, समक्ष पोलीस ठाण्यात उपस्थित राहुन सरकारतर्फे फिर्याद देतो की,मी वरीलप्रमाणे असुन दिनांक 27/11/2025 रोजी पासुन अॅन्टी करप्षन ब्युरो, ठाणे येथे नेमणूकीस आहे. दिनांक 05/01/2026 रोजी नेहमीप्रमाणे दिवसपाळी कर्तव्यावर हजर असताना मला वरिष्ठांनी बोलावुन तक्रारदार यांनी हेल्प लाईन क्रं. 1064 वर संपर्क करून लोकसेवक यांचेविरूध्द तक्रार असलेबाबत सांगुन तक्रारदार यांचा संपर्क क्रमांक देवून तक्रारदार यांचेषी संपर्क करून पुढील कायदेशीर कारवाई करण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी तक्रारदार यांचेशी दिलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क केला असता तक्रारदार यांनी शहापुर येथे येवून तक्रार घेणेबाबत विनंती केली. त्यानुसार आम्ही तसेच दोन शासकिय पंच क्र. 1) श्री. कमलेष विनायक देषमुख, वय 37 वर्षे, पद-सरंक्षण अधिकारी (कनिष्ठ), बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई, 2) श्री. दिपक रामकुष्ण गाडेकर, वय 36 वर्षे, पद-सरंक्षण अधिकारी (कनिष्ठ), अभय केंद्र, आसनगाव यांना उपलब्ध करून घेवून पोहवा/रविंद्र सोनवणे, मपोहवा/जयश्री पवार यांचेसह सरकारी वाहन उपलब्ध नसल्याने माझे स्वतःचे चारचाकी वाहन क्र. एमएच 43, बीयु 1569 या गाडीने शहापुर येथे जाणेकरीता 11.05 वा. रवाना झालो. आम्ही शहापुर येथे आल्यांनतर तक्रारदार यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी खर्डीजवळील मेट्रो हाॅटेल येथे येण्यास सांगितले. त्यावर आम्ही मेट्रो हाॅटेल येथे पोहोचलो असता, तक्रारदार श्री. सुनिल जानू निपुर्ते, वय 38 वर्षे, धंदा बिल्डींग मटेरियल सप्लायर्स, रा. मु. कुंडण, पो. शिरोळ, ता. शहापुर, जि. ठाणे यांची सोबत असलेल्या शासकिय पंच व पोलीस स्टाफची ओळख करून दिली. त्यांनतर तक्रारदार यांचेकडे लोकसेवक यांचेविरूध्दचे तक्रारीबाबत विचारले असता त्यांनी सांगितले की, त्यांचा बिल्डिंग मटेरियल सप्लायचा व्यवसाय असुन मागणीप्रमाणे ते वाडा येथुन रितसर राॅयल्टी भरून मटेरियल खरेदी करून खर्डी व आजुबाजुचे परिसरात विक्री करतात. दिनांक 02/01/2026 रोजी त्यांचे मालकीचा ट्रक क्र. एम.एच.04 सी.पी.6 368 मधुन वाॅश सँड वाडा येथुन घेवून येत असताना टेंभा येथील वन विभागाचे चेक पोस्ट त्यांचा ट्रक अडवलेबाबत तक्रारदार यांचे चालक श्री. जितेंद्र दिवा यांनी फोन करून सांगितले. त्यावर वन विभागातील रस्त्याने जाण्यासाठी परवानगी घेणे आवष्यक असल्याने त्याकरीता खर्डी येथील वन विभागाचे वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड यांना भेटण्याबाबत सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार हे खर्डी येथील वन विभागाचे वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड यांना भेटले असता त्यांनी तक्रारदार यांना वन विभागातील रस्त्याने माल वाहतुक करण्याकरीता प्रत्येक ट्रकचे एका महिन्याकरीता 75,000/-रू दयावे लागतील, असे सांगितले. परंतु तक्रारदार यांनी घेतलेल्या माहितीनुसार वन विभागातुन अशी वाहतुक करण्यासाठी कोणत्याही परवानगीची आवशकता नसुन कोणतेही शुल्क लागत नाही. त्यामुळे लोकसेवक वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड हे मागत असलेले पैसे हे लाचेची रक्कम असल्याने व तक्रारदार यांचीही लोकसेवक यांना लाच देण्याची मुळीच इच्छा नसल्याने त्यांनी हेल्पलाईन क्र. 1064 वर काॅल करून तक्रार केलेबाबत सांगितले. तक्रारदार यांना अधिक विचारपुस करता त्यांनी सांगितले की, त्यांचेप्रमाणे इतर सप्लायरवाले श्री. अभिषेक दळवी, श्री. प्रमोद दुभेले, श्री. हसन शेख, श्री. भास्कर विषे व श्री. ताहीर शेख यांचेकडेही लोकसेवक वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड हे पैसे मागत असल्याचे समजल्याने वरील नमुद सहकारी यांनी तक्रारदार यांना अधिकार पत्र देवून नमुद लोकसेवक यांचेविरूध्द कारवाई करणेकरीता संमती दिलेली आहे. त्यावरून तक्रारदार यांनी वरीलप्रमाणे तक्रार केली आहे. तक्रारदार सांगत असलेली तक्रार त्यांनी स्वःहस्तक्षरात लिहुन सादर करून त्यासोबत इतर सहकारी यांनी दिलेले अधिकार पत्र सादर केले. सदरची तक्रार उपस्थित दोन्ही शासकिय पंचांना वाचण्यास देवून त्यांनी तक्रार वाचुन तक्रारदाराकडे खात्री केली. सदर तक्रारीवर पंच व मी सहया केल्या आहेत.ानंतर तक्रारदार यांनी दिलेली तक्रारीची पडताळणी करणे आवश्यक असल्याने तक्रारदार, त्यांचे सहकारी, शासकिय पंच क्र. 1 व 2 तसेच कारवाई पथकातील स्टाफ यांना सविस्तर सुचना दिल्या. तक्रारीची पडताळणी



Scanned with OKEN Scanner

करण्याकरीता तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर मध्ये Sandisk कंपनीचे 16 जीबी क्षमतेचे मेमरी कार्ड टाकुन सदरचे व्हॉईस रेकॉर्डर लावुन सहकारी श्री. अभिषेक दळवी व पंच क्र. 1. श्री. कमलेष देशमुख यांना लोकसेवक वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड यांचेशी बोलणी करणेकरीता तक्रारदार यांचे वाहन हुंडाई क्रेटा मोटार कार क्र. एमएच 04 एमए 8024 मधुन पाठवले. त्यावेळी तक्रारदार व त्यांचे सहकारी श्री. अभिषेक दळवी यांची लोकसेवक वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड यांचेषी पंच क्र. 1 यांचेसमक्ष कार्यालयाचे आतील रूममध्ये बोलणी झाली. त्यामध्ये लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी टेबलवरील एका कागदावर लास्ट 50,000/- रू. प्रति गाडीचे असे लिहुन प्रति गाडीचे 50,000/- रू. लाचेची मागणी केली. परंतु, तक्रारदार यांनी कमी करण्यास सांगितले असता, लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी त्यांचे हातावर 40,000/-रू. लिहुन प्रति गाडीचे 40,000/-रू. प्रमाणे लाचेची मागणी केली. त्यावर तक्रारदार यांनी 30,000/-रू. सांगितले असता लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी नकार दिला असता, तक्रारदार यांनी 35,000/-रू. प्रति गाडीचे करा, असे म्हटले असता, त्यावर लोकसेवक वनरक्षक श्री. राठोड यांनी होकार दिला, त्याप्रमाणे 6 गाडयाचे एकुण होणारी रक्कम उदया दिनांक 06/01/2026 रोजी आणुन देण्याबाबत लोकसेवक वनपाल श्री. भोईर व वनरक्षक श्री. राठोड यांनी तक्रारदार यांना सांगितले. सदरचा सविस्तर पडताळणी पंचनामा दिनांक 05/01/2026 रोजी 10.15 वा. सुरू करून 23.50 वा. पुर्ण केलेला आहे. त्याप्रमाणे तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता त्यांनी लाचेची रक्कम मोठी असल्याने 2 दिवसाचा अवधी लागेल असे सांगितल्याने तात्पुरती कारवाई थांबवुन सापळा कारवाई दिनांक 08/01/2026 रोजी करण्याचे सर्वानुमते ठरवले. दिनांक 08/01/2026 रोजी तक्रारदार यांचेशी संपर्क करून मी स्वतः तसेच दोन शासकिय पंच व पोहवा/सोनवणे, सुर्यवंशी व मपोहवा/पवार असे हिल टॉप हॉटेल, खर्डी येथे माझे स्वतःचे वाहन क्र. एमएच 43, बीयु 1569 ने येवून थांबलो असता तक्रारदार यांनी लाचेची रक्कम 2,10,000/- रू. पैकी 1,50,000/-रू. रक्कमेच्या 500/- रू. दराच्या एकुण 300 नोटा हजर केल्या, बाकीची रक्कम उपलब्ध होत नसल्याचे सांगितल्याने आम्ही खेळण्यातील डमी नोटा वापरण्याचा निर्णय घेवून 60,000/-रू. रक्कमेच्या 500/- रू. दराच्या एकुण 120 नोटा खेळण्यातील डमी नोटा वापरल्या. त्याप्रमाणे सापळापूर्व पंचनामा करून पोहवा/सुर्यवंशी यांनी तक्रारदार, पंच क्र. 1 व 2, तसेच कारवाई पथकातील स्टाफला अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म सांगुन तक्रारदार यांनी सादर केलेल्या लाच रक्कमेतील भारतीय चलनी नोटा व खेळण्यातील बनावट नोटांचे 4 बन्डल बनवुन नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून सदरच्या नोटा एका गुलाबी रंगाच्या कापडी पिशवीत ठेवून सदर पिशवी वरही अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली. त्यानंतर पुन्हा व्हॉईस रेकॉर्डरमध्ये Sandisk कंपनीचे 16 जीबीचे मेमरी कार्ड टाकुन तक्रारदार यांचे सहकारी श्री. प्रमोद दुभेले यांनी लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांना मोबाईलवर कॉल करून पैशांची व्यवस्था झालेली असल्याचे सांगुन पैसे देण्यासाठी कुठे येवू असे विचारले असता, लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांचे कर्जत येथे नातेवाईक मयत झाल्याने उदईक रोजी भेटणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे सविस्तर पंचनामा दिनांक 08/01/2026 रोजी 08.05 वा. सुरू करून 16.35 वा. पुर्ण करण्यात आलेला असुन सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. दिनांक 09/01/2026 रोजी सकाळी 10.00 वा. तक्रारदार यांचे सांगणेप्रमाणे हिल टॉप हॉटेल, खर्डी येथे उपस्थित राहुन सापळा कारवाईबाबत तक्रारदार, सहकारी श्री. प्रमोद दुभेले, पंच क्र. 1 व 2 व स्टाफ यांना समक्ष सुचना देवून सहकारी श्री. दुभेले यांना लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांना मोबाईलवरून कॉल करण्यास सांगितले, त्यावेळी लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी खर्डी मार्केट येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार, सहकारी श्री. दुभेले व पंच क्र. 1 श्री. दिपक गाडेकर यांना तक्रारदार यांचे वाहन हुंडाई क्रेटा मोटार कार क्र. एमएच 04 एमए 8024 मधुन पाठवले. त्यांचे पाठोपाठ पोहवा/सोनवणे व मपोहवा/पवार यांना सहकारी श्री. अभिषेक दळवी यांचे मोटार सायकल क्र. एमएच 15, सीसी 3995 वरून पाठवुन त्यांचे पाठोपाठ मी तसेच पंच क्र. 2 व पोहवा/सुर्यवंशी यांचे चारचाकी वाहन क्र. एमएच 04, केएल 1177 ने रवाना होवून खर्डी मार्केट परिसरात कोणालाही संशय येणार नाही, अशा पध्दतीने थांबलो. त्यावेळी तक्रारदार व सहकारी श्री. दुभेले हे मार्केटमधील दत्त नाष्टा सेंटर येथे नाष्टा करून पुन्हा लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांना तक्रारदार यांनी कॉल केला असता, लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी खर्डी-वाडा रस्त्याला येण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही सापळा पथकास सुचना देवून खर्डी-वाडा रस्त्यावर कोणालाही संशय येणार नाही, अशा पद्धतीने तक्रारदार हे नजरेच्या टप्प्यात दिसतील असे थांबलो. त्यानंतर खर्डी-वाडा रस्त्याला बागेचा पाडयाचे पुढे चंदन पार्कसमोरील रस्त्यावर लोकसेवक वनपाल श्री. भोईर हे उभे असलेल्या ठिकाणी तक्रारदार यांनी त्यांची कार त्यांचे बाजुला नेवून उभी केली, तक्रारदार यांनी लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांना गाडीत बराण्यास बोलले असता, त्यांनी नकार दिल्याने तक्रारदार स्वतः गाडीतुन खाली उतरले. त्यावर तक्रारदार व लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांचेशी चर्चा करून लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी पैसे स्विकारण्यास संमती दर्शवली असता तक्रारदार यांनी कारच्या पुढच्या डिक्कीत ठेवलेली



Scanned with OKEN Scanner

पैशांची गुलाबी रंगाची कापडी पिशवी काढुन लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांचेकडे देण्यासाठी पुढे केली असता लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांनी सोबत आणलेल्या मोरपंखी रंगाच्या पिशवीमध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी लाचेची रक्कम लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांचे पिशवीत ठेवल्यानंतर सहकारी श्री. दुभेले यांनी सापळा पथकास पूर्वनियोजित इशारा केला असता, सापळा पथकाने लोकसेवक वनपाल श्री. भोईर यांना लाच रक्कमेसह ताब्यात घेतले. नमुद ताब्यात घेतलेले लोकसेवक श्री. भोईर यांना त्यांचे नाव पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. भगवान जयराम भोईर, वय 57 वर्षे, परिमंडळ वनअधिकारी (काष्टी), खर्डी, राह. धनश्री अपार्टमेंट, फ्लॅट नंबर 03, रिध्दी-सिध्दी नगर, चेरपोली, तालुका शहापूर, जि. ठाणे असे सांगितले. त्यांना लोकसेवक वनरक्षक श्री. राठोड यांचेबाबत विचारले असता त्यांनी वनरक्षक श्री. राठोड हे काष्टी गावाकडे बिबटया आल्याचा का◌ॅल होता, त्याकरीता ते काष्टीला गेल्याचे सांगितले. त्यावर लोकसेवक वनरक्षक श्री. राठोड यांचे पूर्ण नाव व पत्ता विचारला असता त्यांनी वनरक्षक श्री राठोड यांचे पूर्ण नाव श्री. नितेश हुकूमचंद राठोड, वय 38 वर्षे, वनरक्षक (वासिंद), खर्डी, राह. शुभवास्तू, सेक्टर 2, विंग यु, रूम नं. 101, पहिला माळा, वासिंद, ता. शहापूर, जि. ठाणे असे सांगितले. त्यानंतर नमुद लोकसेवक श्री. भगवान भोईर, परिमंडळ वनअधिकारी यांना ताब्यात घेवून खर्डी येथील त्यांचे कार्यालयात येवून त्यांची अंगझडती घेवून लाचेची रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. सदर प्रक्रियेची मोबाईल मध्ये वेगळे Sandisk कंपनीचे 8 जीबी क्षमतेचे मेमरी कार्डमध्ये व्हिडीओ शुटींग करण्यात आलेली असुन लाच रक्कम 2,10,000/-रू. पैकी 1,50,000/-रू. किमंतीच्या 500/-रू. दराच्या 300 भारतीय चलनी नोटा व 60,000/-रू. किमंतीच्या 500/-रू. दराच्या 120 खेळण्यातील डमी नोटा जप्त करण्यात जप्त आलेल्या आहेत.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
MUKESH MURLIDHAR DHAGE(I (Inspector)) / DGPMMDM8101 **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**No.**(क्र.):
**Rank** (पद):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

Scanned with OKEN Scanner

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
शहापूर पोलीस स्टेशन
ठाणे ग्रामीण

Signature of Officer in char
Police Station
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

Name (नाव): MUKESH MURLID
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): DGPMMDM8101



Scanned with OKEN Scanner